



## सलमान खानच्या सिकंदर चित्रपटाचा दुसरा टीझर रिलीज

मुंबई : सिंकदराचा दुसरा टीझर रिलीज करण्यात आला आहे. या टीझरला सलमानाचे चाहते भरभरून दाद देत आहे. या वर्षीच्या ईदच्या दिवशी सिंकदर देशभरातील थिएटर्समध्ये रिलीज करण्यात येणार आहे. सिकंदरच्या पहिल्या टीझरमध्ये फक्त सलमान खानचे ॲक्शन सीन्स पाहायला मिळाले होते. याही टीझरमध्ये सलमानाचा ॲक्शनपॅक्ट अवतार दाखवण्यात आला आहे. पहिल्या टीझरमध्ये सुना है बहुत सारे लोग मैरे पिछे पडे है बस मेरे मुडने की देर है, हा डॉयलॉग दाखवण्यात आला होता. दुसऱ्या टीझरमध्येही कायदे मै रहो फायदे आवो असा एक डॉयलॉग आहे. या टीझरमध्ये रश्मिकाचाही क्यूट अंदाज दिसत आहे. सिंकदर साजिद नादियाडवाला यांनी सादर केला आहे. चित्रपटाचा टीझर रिलीज होताच आतापर्यंत तब्बल १९ मिलियन्स व्ह्यूज टीझरला मिळाले आहेत.
चित्रपटाचे दिग्दर्शन ए.आर.मुरुगदॉस यांनी केले आहे. सिंकरदरच्या दुसऱ्या धमाकेदार टीझरमध्ये सलमान आणि रश्मिकाची केमिस्ट्री पाहायला मिळत आहे. सलमान खानच्या वाढदिवशी सिंकदर चित्रपटाचा पहिला टीझर रिलीज करण्यात आला होता. पण आता रिलीज करण्यात आलेला दुसरा टीझर जबरदस्त आहे. सिंकदर चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चित्रपटाची जोरदार चर्चा करण्यात येत आहे. थोडक्यात सिंकदरने रिलीजआधीच प्रेक्षकांमध्ये क्रेझ निर्माण केली आहे.

# मराठी भाषेच्या प्रसारासाठी ग्रंथ प्रदर्शनासारखे उपक्रम उपयुक्त

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा दिन साजरा

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी भाषेच्या प्रसारासाठी ग्रंथ प्रदर्शनासारखे उपक्रम उपयुक्त असल्याचे सांगून त्यांनी जिल्हावासियांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी शाहुराज मोरे, तहसिलदार शरद घोरपडे, भाजप नेते विनायक देशमुख आदी उपस्थित होते. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारात मायबोली मराठीचा वापर अधिकाधिक होणे आणि विविध क्षेत्रातील ज्ञान मराठी पुस्तकांच्या माध्यमातून पोहोचविले जाणे आवश्यक असल्याचे मतही पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाला मराठी भाषा समितीचे सदस्य किशोर मरकड, पत्रकार अशोक निंबाळकर, उपजिल्हाधिकारी भारती सगरे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बढे, तहसिलदार शरद घोरपडे, डॉ. अमोल बागुल आदी उपस्थित होते.

मोरे म्हणाले, व्यवहारात सुटसुटीत भाषा आणि सोप्या शब्दांचा उपयोग करणे गरजेचे आहे. विशेषतः शासकीय कार्यालयात सामान्य माणसाला कळेल अशा शब्दांचा उपयोग करावा. भाषेच्या विकासासाठी समाजमाध्यमांवरील मजकूर मराठीतून तयार करण्यास प्रोत्साहीत करण्यात यावे. एखाद्या पुस्तकावर चर्चा झाल्यास भाषेचा प्रवाह वेगवान होण्यास मदत होत असल्याने मराठीतील पुस्तकांवर चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे. साहित्य संमेलनांसारख्या उपक्रमांचे आयोजन यासाठी उपयुक्त ठरते, असे त्यांनी सांगितले. मराठीतील संशोधनला चालना देणे, शालेयस्तरावर मराठी भाषेसंदर्भातील उपक्रमांचे आयोजन, बोली भाषेचे संवर्धन व अभ्यास या माध्यमातून मराठी भाषा अधिक समृद्ध होईल, असेही मोरे म्हणाले.

निंबाळकर म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाचा मिळाल्यांनंतर या कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याने या दिवसाला महत्व आहे. शासकीय कार्यालयांमध्ये मराठीचा उपयोग अनिवार्य करण्यात आला आहे. भाषेच्या विकासामुळे सांस्कृतिक विकासालाही चालना मिळत असते. त्यामुळे मातृभाषेचे संवर्धन आवश्यक आहे. लेखक भाषेला समृद्ध करतो, त्यामुळे शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी देखील लेखन करावे. विशेषतः व्यवहारातील शब्द आणि भाषेबाबत लिखाण आवश्यक आहे. त्यासोबतच बोली भाषाही समृद्ध करण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मरकड म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषा जगाच्या नकाशावर पोहोचली आहे. मराठीचे संवर्धन करण्याची आणि तिला समृद्धीच्या शिखरावर नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. महसूल संबंधी पुस्तकांचेदेखील एक ग्रंथालय असणे आवश्यक आहे. प्रत्येकाने किमान आठ दिवसात एखादे पुस्तक वाचावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कार्यालयतील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमा निमित्त डॉ.बागूल यांनी काढलेली रांगाळी विशेष चित्तवेधक आणि माहितीपूर्ण होती.

# सरकारच्या माध्यमातून विकास कामांसाठी मोठा निधी

### संभाजी कदम । नंदनवन कॉलनी रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजाप्रती बांधिलकी जोपासत आहे. शिवसेना पक्षच जनतेचे प्रश्न सोडू शकतो, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून शहरातील विकास कामांसाठी मोठा निधी मिळाला आहे. प्रभाग क्रमांक १२ मधील नगरसेवकांनी विकासाच्या योजना यशस्वीपणे राबविले असून, नागरिकांना विश्वासात घेऊन नियोजनबद्ध व कायमस्वरूपी कामे मार्गी लावली असल्यामुळे आता ती पुन्हा-पुन्हा करण्याची गरज भासणार नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून पिंपळगाव माळवी येथील महापालिकेच्या जागेवर पर्यटन स्थळ निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन संभाजी कदम यांनी केले.

प्रभाग क्रमांक १० मधील नंदनवन कॉलनी येथे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ डॉ. रंगनाथ सांगळे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी माजी महापौर सुरेखा कदम, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहर प्रमुख सचिन जाधव, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शिवसेनेचे माजी शहरप्रमुख संभाजी कदम, माजी नगरसेवक दत्ता कावरे, परेश लोखंडे, रवींद्र कटारिया, मयूर बोरा, दिलीप मुनोत, मदनलाल कोठारी, दत्तात्रय चौधरी, अलका चौधरी, विद्या मडके, अनुराधा पवार, लक्ष्मी बोरा, दादासाहेब मडके, डॉ. अमेय सांगळे आदी उपस्थित होते. बाळासाहेब बोराटे म्हणाले की, नगरसेवक पदाच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन केले असल्यामुळेच प्रभागातील नागरिकांनी ४ ही नगरसेवक शिवसेनेचे निवडून दिले. त्या माध्यमातून प्रभागातील बहुतांश विकासाची कामे मार्गी लावली आहे, नागरिकांच्या सुखदुःखामध्ये सामील होत मूलभूत प्रश्न तातडीने सोडविण्याचे काम केले जाते असे ते म्हणाले. डॉ.रंगनाथ सांगळे म्हणाले की नंदनवन कॉलनी ही सुसंस्कृत म्हणून नावारूपाला आली आहे. येथील विकासाचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम नगरसेवकांनी केले आहे. चांगले काम करणाऱ्याच्या पाठीमागे जनता उभी राहत असते असे ते म्हणाले.

# गुणे आयुर्वेद रुग्णालयात सर्व रोग निदान शिबिर

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

आयुर्वेद शास्त्राचे महान तपस्वी वैद्य पंचानन गंगाधरशास्त्री गुणे यांच्या पुण्यतिथी निमित्त नगरच्या गुणे आयुर्वेद रुग्णालयात २५ मार्च पर्यंत अत्यल्प दरात सर्व रोग निदान व चिकित्सा शिबिर आयोजित केले आहे. याशिबिरात अत्यल्प दरात रुग्णांवर सर्वप्रकारचे शुद्ध आयुर्वेदीय उपचार करण्यात येणार आहेत, अशी माहिती आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार अरुण जगताप यांनी दिली.

सर्व रोग निदान व चिकित्सा शिबिरात आयुर्वे दातील तज्ञ वैद्य विविध व्याधींवर शुद्ध आयुर्वेदीय उपचार करणार आहेत. यामध्ये मुळव्याध भगंदर शस्त्रक्रिया, त्वचा रोग, वात व्याधी, बालरोग, स्त्रीरोग, पोटाचे विकार तसेच इतर सर्व जुनाट आजारांवर आयुर्वेदिक उपचार होणार आहेत. तरी सर्व गरजू रुग्णांनी अत्यल्प दरात होणाऱ्या या शिबिराचा लाभ घ्यावा, आवाहन गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य दत्तात्रय लोडे यांनी केले आहे.

# स्वसंरक्षणासाठी लाठी-काटी प्रशिक्षण आवश्यक

### महेश आनंदकर । 'निर्भय कन्या अभियाना'चा समारोप



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

आजच्या घडीला महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. वृत्तपत्राची दररोज पाने चाळली असता, एकही दिवस असा जात नाही की, ज्या दिवशी तरुण मुली, बालिका आणि महिला यांच्यावर अन्याय, अत्याचार होत नाही. या घटनांचे प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती बरोबर तरुणींना कराटे, लाठी-काटी प्रशिक्षण आवश्यक आहे. असे प्रतिपादन अरुणोदय क्रिडा प्रतिष्ठानचे संचालक महेश आनंदकर यांनी केले. अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य आर .जे. बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखालीली 'निर्भय कन्या अभियाना'चा समारोप करण्यात आला. तीन दिवसीय अभियानात विविध व्याख्याने आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयीन तरुणींना कायदे विषयक मार्गदर्शन, आरोग्य विषयक मार्गदर्शन तसेच स्वसंरक्षणार्थ कराटे व लाठी- काठी प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी या प्रशिक्षणात महेश आनंदकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ. प्रितमकुमार बेदरकर हे उपस्थित होते. उपप्राचार्य प्रा.डॉ. नोएल पारगे म्हणाले की,आजचे प्रशिक्षण विद्यार्थिनींना त्यांच्या भविष्यामध्ये निश्चित उपयोगी पडेल. यामधून त्या स्वतःचे स्वसंरक्षण करण्यास आत्मनिर्भर बनतील, असे सांगितले. यावेळी अरुणोदय प्रशिक्षण केंद्राच्या स्वाती आनंदकर ,शिवानी वाळके या ट्रेनर उपस्थित होत्या. पलक ,बलभीम आणि भार्गवी या छोट्या विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिक करून दाखवली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रियंका मुंगसे, साक्षी निकम, कापसे वैष्णवी, प्रतीक्षा जिने, पूजा मस्के गोपाळे मनीषा, कुलाट प्राची, साक्षी शेळके, पांडुरंग मस्के ,दीपक चांदे आणि औटी दीपक यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. भागवत परकाळ यांनी केले.

# शिशू संगोपन संस्थेत मराठी भाषा गौरव दिन साजरा

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



अनेक संत, साहित्यिक, प्रतिभावंतांनी आपल्या लेखणीतून, मराठी भाषेला समृद्ध केले आहे, ही साहित्याची समृद्धी जनसामन्यांपर्यंत पोहचवून 'मराठी भाषेला' आणखी समृद्ध करण्याची आपली जबाबदारी आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक तथा कवी सुभाष सोनवणे यांनी केले.

शिशू संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशाला येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कवी वि.वा शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी साहित्यिक सुभाष सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी साहित्य परिषदेचे अध्यक्ष किशोर मरकड, संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र.धो. कासवा, सहसचिव राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत, माजी प्राचार्य विश्वास काळे, सिनेट सदस्य शिवाजी साबळे, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, मनसुखलाल पिपाडा, सचिन डागा, केंद्र प्रमुख पोपटराव धामणे, बन्सी नन्नवरे, विनोद कटारीया, कांचन गावडे, माध्य.मुख्याध्यपक दत्तात्रय कसबे, प्राथमिक मुख्याध्यापिका योगिता गांधी आदी उपस्थित होते. यावेळी किशोर मरकड, संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा यांनी मराठी भाषा दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्तविकात संस्थेचे उपाध्यक्ष दशरथ खोसे यांनी केले. सुत्रसंचालन निलेश आंबेकर यांनी केले तर जयश्री कोदे गिते सादर करुन सर्वांचे मने जिंकले.

# नगर सीए शाखेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्‌घाटन

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



सीएच्या नगर शाखेने विद्यार्थ्यांच्या पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी आणि शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी एक उल्लेखनीय पाऊल उचलले आहे, ज्यामध्ये अत्याधुनिक सुविधांसह एक प्रगत वाचन कक्ष आणि त्यांच्या परिसरात सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन केले आहे.

सीए विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण वातावरण प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले प्रगत वाचन कक्ष, प्रतिष्ठित आयकर गुरु सीए डॉ. गिरीश आहुजा यांच्या हस्ते उद्घाटन झाले. आरामदायी आसनव्यवस्था, वातानुकूलन, समर्पित अभ्यास कक्ष, पॉवर बॅकअप आणि डिजिटल संसाधन केंद्राने सुसज्ज, ही सुविधा विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात सर्वोत्तम शक्य सुविधांसह मदत करण्याचा उद्देश ठेवते. सीए डॉ. आहुजा यांनी भविष्यातील चार्टर्ड अकाउंटंट्स घडवण्यासाठी सुसज्ज अभ्यास जागेच्या भूमिकेवर भर दिला. सीए नगर शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा यांनी मान्यवरांचे, माजी अध्यक्षांचे आणि सदस्यांचे त्यांच्या अढळ पाठिंब्याबद्दल आभार मानले. त्यांनी अधोरेखित केले की ॲडव्हान्स्ड रीडिंग रूम असणे हे त्यांचे स्वप्न होते जे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे अभ्यासाचे वातावरण प्रदान करेल, तर सौर ऊर्जा प्रकल्प शाश्वतता आणि खर्च कार्यक्षमतेच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे. यावेळी व्यवस्थापकीय समिती पदाधिकारी सीए प्रसाद पुराणिक (उपाध्यक्ष), सीए अभयकुमार कटारिया (सचिव), सीए महेश तिवारी (खजिनदार), सीए ज्ञानेश्वर काळे व सीए पवनकुमार दरक (माजी अध्यक्ष) तसेच माजी अध्यक्ष सर्वश्री सीए मोहन बरमेचा, सीए संजय देशमुख, सीए अजय मुथा, सीए मिलिंदजांगडा, सीए सुशिल जैन, सीए प्रसाद भंडारी, सीए ज्ञानेश कुलकर्णी , सीए (डॉ) परेश बोरा, सीए किरण भंडारी, सीए संदीप देसरडा तसेच सीए, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सत्कर्म करुन भगवंतांचे नामस्मरण केल्यास मुक्ती

### जाधव महाराज । फुलसौंदर मळा येथील सप्ताहाची सांगता

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



अहिल्यानगर ही संताची भुमी आहे. ज्ञान आणि अध्यात्म या क्षेत्रात अग्रेसर आहे. आपल्याला उज्वल संस्कृतीचा वारसा आहे. विविधतेत एकता ही भारताची संस्कृती आहे. भारतीय संस्कृती पाश्चिमत्य देशाप्रमाणे आधारलेली नसून, त्यागावर आधारलेली आहे. त्यासाठी सर्वांनी अध्यात्माचा प्रचार व प्रसार करावा, त्यातुनच मनुष्याला शांती लाभणार आहे. मनुष्य जन्म हा आपला व आपल्या कुळाचा उद्धार करण्यासाठी मिळालेला आहे. या जन्मात आपण सत्कर्म करुन भगवंतांचे नामस्मरण केले पाहिजे, त्यातुनच आपणास मुक्ती मिळेल, असे मौलीक विचार अमोल महाराज जाधव यांनी मांडले.

फुलसौंदर मळा येथे अखंड हरिनाम सप्ताहांतर्गत काल्याची हंडी अमोल महाराज जाधव यांच्या हस्ते फोडण्यात आली. याप्रसंगी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, भिंगार बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर, नगरसेवक गणेश कवडे, अनिल बोरुडे, शाम नळकांडे, सुरेश तिवारी,राजेंद्र फुलसौंदर, गणेश फुलसौंदर, एल.के. आव्हाड, अनिल ठोकळ, कारभारी सुपेकर, इंजि.अनिल साळूंके, सुधीर बाफना, संजय चाफे, पुरुषोत्तम चाफे, ऋषिकेश चाफे आदि उपस्थित होते. पुढे बोलतांना जाधव महाराज म्हणाले, आजच्या धावपळीच्या जीवनात मनुष्य एवढा व्यस्त झाला आहे की, आपण कुठे चाललो, काय करतो याचे भान राहिले नाही; त्यामुळे मनुष्यास शांती मिळत नाही. मनुष्यास जर समाधान, शांती पाहिजे असेल तर अध्यात्माशिवाय पर्याय नाही. गेल्या २६ वर्षांपासून प्रथम महापौर भगवान फुलसौंदर हे सप्ताहाच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना हा मोठा लाभ मिळवून देत आहे. असे ते म्हणाले.

याप्रसंगी माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले, गेल्या २६ वर्षांपासून या सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असून, भाविकांचाही त्यास मोठा प्रतिसाद मिळत असतो. याप्रसंगी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव तसेच उकृष्ट रांगोळी काढल्याबद्दल आर्किटकट अपर्णा फुलसोंदर,पोपट राऊत, राजेंद्र फुलसोंदर, संजय चाफे आणि पुरुषोत्तम चाफे ,दिंडे आदींचा सन्मान करण्यात आल. काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचा लाभ अनेक भाविकांनी घेतला. यावेळी विश्वनाथ महाराज राऊत, संभाजी कदम, सचिन जाधव, सचिन शिंदे, दत्ता कावरे, दत्ता जाधव, परेश लोखंडे, गजानन ससाने, अशोक कानडे,पांडुरंग नन्नवरे, मधुकर शिंदे, बाळासाहेब जाधव, कुंडलिक गदादे, अनिल इवले, प्रभाकर भांबरे आदी उपस्थित होते.काल्याचे कीर्तनाचे महाप्रसादाचे संजय चाफे आणि पुरुषोत्तम चाफे यांच्यावतीने करण्यात आले. सूत्रसंचालन भास्करराव गायकवाड यांनी केले तर अवधूत फुलसौंदर यांनी आभार मानले.

# एकनाथ शिंदे जनतेच्या मनातील मुख्यमंत्री

### अजय बोरस्ते । सदस्य नोंदणी अभियानानिमित्त बैठक

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



एकनाथ शिंदे यांनी मागील अडीच वर्षांमध्ये राज्यात विकासाच्या विविध योजना यशस्वीपणे राबवल्या. जनतेच्या थेट संपर्कात राहून मुख्यमंत्री काय असतो हे दाखवून दिले, त्यामुळे तेच जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आहे. त्यामुळे शिवसेनेने राबवलेल्या योजना जनतेपर्यंत घेऊन जावे त्या माध्यमातून सदस्य नोंदणी करत पक्ष वाढीचे काम करावे, आगामी निवडणुकासाठी गन-गट व प्रभागात जाऊन सदस्य नोंदणी करावी, ज्याची सदस्य नोंदणी जास्त होईल त्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार केला जाईल, निवडणूक हे युद्ध असते त्याची तयारी आत्ताच सुरू करा. शिवसेना हा लोकांमधील पक्ष असून आता भगवी लाट आली असल्याचे प्रतिपादन शिवसेना उपनेते अजय बोरस्ते यांनी केले. शिवसेना पक्ष सदस्य नोंदणी अभियानानिमित्त अहिल्यानगर पदाधिकारी यांच्या नियोजनाच्या बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहर प्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, दत्ता जाधव, दत्ता कावरे, प्रशांत गायकवाड, महेश लोंढे, आप्पा नळकांडे, सुरेश तिवारी, संग्राम कोतकर, दीपक खैरे, महिला जिल्हाप्रमुख मिरा शिंदे, शबनम इनामदार आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहरप्रमुख सचिन जाधव यांनी केले यावेळी संभाजी कदम यांचे भाषण झाले. कार्यक्रमाचे आभार माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी मानले.

### महापालिकेवर भगवा फडकवणार!

एकनाथ शिंदे यांच्या कामामुळे राज्यात शिवसेना पक्ष मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नगर शहरामध्ये २५ माजी नगरसेवक शिवसेनेत आहे, आता महापालिकेवर देखील शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. सभासद नोंदणी हा पक्ष वाढीसाठी महत्त्वाचा भाग असून प्रत्येकाने मोठ्या प्रमाणात सभासद नोंदणी करावी. तालुका वाईज बैठका घेऊन सदस्य नोंदणी केली जाणार आहे. शहरात सुमारे ७० हजार सदस्य नोंदणी केली जाणार असून जिल्ह्यात १ लाख सदस्य नोंदणी केली जाणार आहे. पक्षातील पदाधिकाऱ्यांमधील मतभेद बाजूला ठेवून शिवसेना वाढीसाठी काम करावे .
-अनिल शिंदे, जिल्हाप्रमुख, शिवसेना अहिल्यानगर

### पूर्वीचे गतवैभव निर्माण कण्यासाठी कामाला लागा!

अहिल्यानगर जिल्हा भगवामय करायचा आहे. शिवसेनेला पूर्वीचे गतवैभव निर्माण करून देण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विचार तळागाळापर्यंत घेऊन जाण्याचे काम आपल्या सर्वांना करायचे आहे. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आदर्श अंगीकारून ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करायचे आहे. समाजातील छोटे छोटे प्रश्न सोडवले तरी जनता आपल्या पाठीमागे उभी राहते.
-बाबुशेठ टायरवाले, जिल्हाप्रमुख, नगर दक्षिण, शिवसेना अहिल्यानगर